भूमी संपादन, पुनवर्सन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर या कार्यालयातील एकूण १३ अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०२६ ते दिनांक ३१.०८.२०२६ (६ महिने) पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- आरपीए-२०१९/प्र.क्र.५६/ई- १६२०२३५/पुनर्वसन-०१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- १८ मे, २०२६.

वाचा:-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए-१४१५/प्र.क्र.४५/२-१, दिनांक २०.१२.२०१६
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए-२०१९प्र.क्र.५६/ **प्र.क्र 1366955/ पुनर्वसन** -१, दिनांक १६.१०.२०२५
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक, दिनांक २८.०२.२०२६
४) निबंधक, भूमी संपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर यांचे पत्र क्रमांक आस्था/ कार्या. क्र. १/कावि-२७/२०२६ दिनांक ०९.०१.२०२६

प्रस्तावना:-

केंद्र शासनाने भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम ५१ नुसार शासन निर्णय दिनांक २०.१२.२०१६ अन्वये भूमी संपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरणाची नागपूर येथे स्थापना करण्यात आली असून त्यासाठी एकूण १३ पदे निर्माण करण्यात आली आहेत. प्राधिकरणाच्या कामाचे स्वरुप (न्यायालयीन कामकाजासारखे) विचारात घेता सदर पदांची नितांत आवश्यकता असल्याने या पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर या कार्यालयातील एकुण १३ अस्थायी पदांना दिनांक १६.१०.२०२६ च्या शासन निर्णयान्वये दिनांक २८.०२.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. आता, वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २८.०२.२०२६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अटीच्या अधिन राहून व प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर या कार्यालयातील विवरणपत्रामध्ये नमूद अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०२६ ते दिनांक ३१.०८.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर अस्थायी पदांवर होणारा खर्च मागणी क्र. सी-५ लेखाशिर्ष- २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण,०१- पुनर्वसन, २०२ इतर पुनर्वसन योजना, (०३) प्रकल्प बाधित व्यक्तींची पुनर्वसाहत,(०३) (०९) भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण (२२३५ सी ०६३) या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२०२७ च्या मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय हा वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/ प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दिनांक. २८.०२.२०२६ मधील प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५१८१२११४२८५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SANJAY MAROTI JAGTAP

Digitally signed by SANJAY MAROTI JAGTAP
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=9EA94B7D58FC204D63A497943E6C56976C537462D5F2964980C309060511D44D7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2C1FC771D686D36A26A8AF97940982698437 8A73F9D4AEECA9902096B6CC25BD, cn=SANJAY MAROTI JAGTAP
Date: 2026.05.18 12:12:44 +05'30'

(संजय जगताप)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रति,

१. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
२. निबंधक, तहसिलदार, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, नागपूर
३. महालेखापाल लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता नागपूर.
४. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
५. वित्त विभाग (आपुक कक्ष), मंत्रालय, मुंबई.
६. कार्यासन अधिकारी (ब-१, / ई-३), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवड नस्ती (पुनर्वसन-०१)

****

विवरणपत्र

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रुपये)	पदसंख्या
१	पिठासीन अधिकारी (जिल्हा न्यायाधीश) Presiding Officer (District Judge)	रेड्डी आयोगानुसार ३-५ (१४४८४०-१९४६६०)	१
२	निबंधक (तहसिलदार संवर्ग)	एस-१९ (५५१००-१७५१००)	१
३	लघुलेखक (निम्न श्रेणी)	एस-१४ (३८६००-१२२८००)	१
४	अव्वल कारकून	एस-१२ (३२०००-१०१६००)	२
५	लिपिक	एस-६ (१९९००-६३२००)	४
६	वाहन चालक	एस-६ (१९९००-६३२००)	१
७	शिपाई	एस-३ (१६६००-५२४००)	३
	एकूण पदे		१३